आज़ादी का
अमृत महोत्सव

MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2021 - Impact Factor : 7.479

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 7, Vol. II, Issue- LII, 29 March 2022

# ECONOMY



- Editor -

**Mrs. Pallavi Laxman Shete**

**Address for Correspondence**

*Mrs. Pallavi Laxman Shete*
Editor in Chief : Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Reffered)
Principal, Sanskriti Public School, Nanded (MH, India) Email : shrishprakashan2009@gmail.com
*Dr. Rajesh G. Umbarkar*
House No. 624 - Belanagar, Near Maruti Temple, Taroda (Kh.) Nanded - 431605 (India - Maharashtra)
Email - umbarkar.rajesh@yahoo.com, shrishprakashan2009@gmail.com Mob. No. 9623979067
Director : Mr. Tejas Rampurkar (For International Contacts only + 91-8857894082)

(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)

## Peer-Review Committee

| | |
|---|---|
| **Dr. U. D. Joshi**<br>Principal<br>Y. College, Ambajogai. (MH., India.) | **Dr. Vasant Biradar**<br>Principal<br>Mahatma Phule College, Ahmedpur. (MH., India.) |
| **Dr. Joshi Prashantkumar Panditdev**<br>Department of Zoology (Fishery Science) Adarsh College, Hingoli-431513 (MH., India.) | **Prof. Dr. Mahendrakumar Y. Kulkarni**<br>Head,Dept. of zoology<br>N.S.B. Colloege, Nanded. (MH., India.) |
| **Dr. Bibhishan Kare**<br>Rrsearch Guide, Professor and HOD<br>Dept. of Sociology, NSB College, Nanded. | **Prof. Dr. Durgadas D. Choudhari**<br>Head Dept. of Economics<br>Mahatma Phule College, Ahmedpur. (MH., India.) |
| **Dr. Prashant Andage**<br>Dept. of Envi. Sci<br>Ratnagiri sub Center, Mumbai University(MH., India.) | **Dr. Sanjay S. Pekamwar**<br>School of Pharmacy,<br>SRTM University, Nanded (MH., India.) |
| **Dr. Shivraj G. Vannale**<br>School of Chemical Sciences<br>S.R.T.M.U. Nanded(MH., India.) | **Dr. Shashikant B. Dargu**<br>Dept. Of Sanskrit<br>N. S. B. College, Nanded(MH., India.) |
| **Dr. Sadavarte Rajesh K.**<br>Dept. of Computer,<br>N.S.B. College, Nanded. (MH., India.) | **Dr. Subhash T. Pandit**<br>Department of Economics,<br>S. V. Night College, Dombivli (E) (MH., India.) |
| **Dr. Kalpana Kadam (Bedre)**<br>Dept of Political Sci., N.S.B. College,Nanded.(MH., India.) | **Dr. Vinay D. Bhogle**<br>Dept. of English Degloor College, Deglor(MH., India.) |
| **Dr. Deshpande R. P.**<br>Dept. Zoology<br>Sharda Mahavidyalaya, Parbhani. (MH., India.) | **Dr. Sharada Bande**<br>Head, Dept. of History, S. S. Suryabhanji Pawar College, Purna (Jn.) (MH.: India.) |
| **Dr.Kamble Ratnakar Ramrao**<br>Associate Professor, Dept.of Economics,<br>Sharda Mahavidyalaya, Parbhani(MH., India.) | **Dr. Gananjay Y. Kahalekar**<br>Mahatma Jyotiba Phule Mahavidyalay,<br>Mukhed Dist. Nanded. (MH., India.) |
| **Dr. Prashant G. Gawali**<br>Associate Professor, Dept. of Physics<br>Bahirji Smarak Mahavidyalya, Basmathnagar,<br>Dist. Hingoli (MH., India.) | **Dr. Vikas Kundu**<br>Geeta College of Education Butana(kundu).<br>Sonepat - Haryana |
| **Prof. K. Varalaxmi**<br>Deputy Director Sanskrit Academy,<br>Osmania University, Hyderabad. | |

## Advisor Committee

| | |
|---|---|
| **Dr. Milind V. Rampurkar**<br>Govt. Ayurved College, Mumbai. (MH., India.) | **Dr. Sudhir Kokare**<br>Nanded. (MH., India.) |
| **Dr. Sanjay G. Shirodkar**<br>Principal<br>Swa. Sawarkar College, Beed. (MH., India.) | **Prof. Dr. Chitanand M. P.**<br>Dept. Of Microbiology<br>N. S. B. College, Nanded. (MH., India.) |
| **Dr. Darmapurikar Bhalchandra V.**<br>Dept. of Political sci., NSB college, Nanded. (MH., India.) | **Dr. Ashish Divde**<br>Head Dept.of Envi.Sci,H.J.P.Mahavidyalaya,H.Nagar.(MH., India.) |
| **Shri. Bidrkar**<br>Shivaji College, Parbhani (MH., India.) | **Dr. Anand R. Ashturkar**<br>Dept. of Envi. Sci. N.S.B.College, Nanded (MH., India.) |
| **Adv. 'adupat Ardhapurkar**<br>Law.,Nanded. (MH., India.) | **Dr. Karale Nagesh Baburao**<br>Saraswati Mahavidyalaya, Kaij Dist. Beed. (MH., India.) |
| **Dr. Nagesh R. Khadkekar**<br>SRTMU, Nanded. (MH., India.) | **Dr. Jeevan Pimpalwadkar** (Marathi)<br>Research Guide, SRTMU Nanded. (MH., India) |
| **Dr. A.I. Shaikh**<br>Associate Professor & Head, School of Social Sciences,<br>SRTMU, Nanded. (MH., India) | **Dr. Rajendr Jadhav**<br>Nanded. (MH., India.) |
| **Shri Bharat Jangam**<br>Director Jangam Academy, Nepal.. | **Dr. Jayanth Chapla**<br>Dept of Zoology Osmania University, Hyderabad. (India) |
| **Shri. Santkumar Mahajan**<br>Nanded. (MH., India.) | |

# INDEX


| Sr. No. | Title of the Paper | Name of Author | Page No. |
|---|---|---|---|
| 01. | महाराष्ट्रातील मानव विकासाचे वास्तव आणि उपाययोजना | प्रा. पंढरीनाथ दिसागज | 01 |
| 02. | केंद्र - राज्य घटनात्मक आर्थिक सहसंबंध | डॉ. सी. डी. राजपुत | 07 |
| 03. | क्रिप्टो करन्सी- एक अभ्यास | प्रा. सुजाता वसंत आहेर<br>डॉ. बी. एस. आव्हाड | 11 |
| 04. | सेंद्रिय शेती : एक काळाची गरज | प्रा. रामेश्वर भाऊसाहेब पवार | 14 |
| 05. | कोरोना आणि भारतीय अर्थव्यवस्था | प्रा.डॉ.आर.पी. पाटील<br>जनार्दन जानजी देवरे | 19 |
| 06. | उदयोन्मुख भारतीय अर्थव्यवस्थेपुढील आव्हाने | प्रा. डॉ. डी. एन. सोनवणे | 22 |
| 07. | भारतीय भाषांमध्ये उच्च शिक्षण | प्रा. डॉ. देशमुख बिभीषण | 26 |
| 08. | आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रातील अभ्यासात विनिमय दराचे महत्व संकल्पना आणि प्रकार | Dr. Sunita B Ahire | 30 |
| 09. | स्त्रियांचे श्रम आणि अर्थकारण | अजय एकनाथ अहिर | 39 |
| 10. | भारतीय महिलांचे आर्थिक सबलीकरण | ज्योती प्रविणचंद्र पाटील<br>जयश्री पुरुषोत्तम मरोदे | 43 |
| 11. | राष्ट्रीय कृषी पीक विमा योजना : सिंहावलोकन | डॉ. एम. व्ही. हिरे | 47 |
| 12. | कृषीक्षेत्र ते सेवाक्षेत्र, अर्थजगतात स्वतंत्र भारताचा समृद्ध प्रवास! | राजेश गंगाधरराव उंबरकर | 52 |
| 13. | कृषी क्षेत्रात माहिती तंत्रज्ञानाचे योगदान | सुजाता रविंद्र मगरे | 55 |
| 14. | महात्मा ज्योतीराव फुले यांचे सामाजिक योगदान | प्रा. जे. आर. भावसार | 57 |
| 15. | २१ व्या शतकातील मराठी चित्रपटांचे बदलते रूप व आर्थिक वाटचाल. | जयराम राजीव माळी | 59 |
| 16. | मराठवाडा विभागातील वैद्यकीय पायाभूत सुविधेचा अभ्यास | विठ्ठल हरिभाऊ नागरे<br>डॉ. जी. आर. खेडकर | 63 |
| 17. | भारतातील बेकारीची भिषणता | डॉ. राजेंद्र एन. बोरसे | 70 |
| 18. | महिला सक्षमीकरणातील महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची भूमिका एक चिकित्सक अभ्यास | कामिनी शशिकांत देवरे<br>डॉ. बी. एम. सोनवणे सर | 72 |
| 19. | नाशिक जिल्ह्यातील लोकसंख्या वितरण : तुलनात्मक विश्लेषण | प्रा. एस. आर. पगार | 77 |
| 20. | भारतीय आर्थिक सुधारणा | जीवन अशोक गुंजाळ | 80 |
| 21. | जागतीकीकरण : भारतीय शेती आणि अर्थव्यवस्था एक अभ्यास | प्रा. पी. डी. हुडेकर | 83 |
| 22. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार आणि सद्यस्थितीतील उपयुक्तता | नंदिनी मनोज लखेरी | 89 |

| | | | |
|---|---|---|---|
| 23. | महाराष्ट्र राज्याची जमीन धारणा आणि तृणधान्यपीक पद्धतीचा अभ्यास | प्रा. रघुनाथ मुरलीधर आंबेकर | 93 |
| 24. | जलव्यवस्थापन, जलसिंचन - काळाची गरज | राहुल मोरेश्वर लभाने | 97 |
| 25. | "असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचा सामाजिक, आर्थिक व आरोग्य विषयक स्थितीचा अभ्यास विशेष संदर्भ नाशिक शहर" | महेंद्र जयवंत खरे<br>प्रा. डॉ. शामराव भगवान वायसे | 10 |
| 26. | 21 व्या शतकातील भारताचा औद्योगिक विकास | अहिरे पूजा मनोहर | 11 |
| 27. | केंद्र – राज्य आर्थिकसंबंध : सिंहावलोकन | BIRARI TANMAY SHARAD | 11 |
| 28. | आंतरराष्ट्रीय संबंधातील नवीन राजकीय अर्थव्यवस्था | प्रा. डॉ. मनिष सोनवणे | 12 |
| 29. | भारतातील डिजिटल शेतीचे भविष्य | डॉ. मनोज व्ही. जगताप<br>डॉ. हिरामण एम. क्षीरसागर | 13 |
| 30. | भारतातील सहकार आणि महिला सबलीकरण | प्रा. इंद्रजित ऐवळे | 13 |
| 31. | शेतमाल विक्री व्यवस्थेतील समस्या आणि उपाय | डॉ. एम. जी. थोपटे | 13 |
| 32. | दारिद्र्य आणि बेरोजगारी देशाच्या आर्थिक विकासातील एक अडथळा | प्रा. पारधी प्रवीण सोमा | 14 |
| 33. | केंद्र- राज्य वित्तीय संबंध<br>Central -State Financial Relation | प्रा. डॉ. जगदीश देशमुख | 15 |
| 34. | कृषि विकासामध्ये नवीन तंत्रज्ञानाची भूमिका आणि परिणामांचा अभ्यास | डॉ. विठ्ठल फुलारी<br>पवन चुंगडे | 15 |
| 35. | कृषीव्यवसाय उद्योग क्षेत्र संधी आणि आव्हाने<br>(Agri-business Industries Opportunities & Challenges) | प्रोफेसर डॉ. सुहास आव्हाड<br>डॉ. गणेश वाळुंज | 15 |
| 36. | केंद्र-राज्य वित्तीय आणि राजकीय संबंध | बालाजी सोनबा खरोडे | 162 |
| 37. | केंद्र व राज्य आपत्तीच्या स्थितीत राजकीय संबंधांचा अभ्यास | प्रा. डॉ. स्वामी विरभद्र गुरप्पा | 16 |
| 38. | दारिद्रय आणि बेरोजगारी | प्रा. डॉ. खोकले आर. के. | 17 |
| 39. | "नाशिक जिल्ह्यातील शेती विकासात कृषीपर्यटनाची भूमिका" | वाघ जीवनकुमार शामराव<br>डॉ. हिरामण मधुकर क्षिरसागर | 17 |
| 40. | "शेतकरी आठवडे बाजार एक अर्थार्जन रोजगार" | प्रा. पंकजकुमार सुरेश गांगुर्डे | 18 |
| 41. | शेती विकासाच्या दृष्टिकोनातून कन्नड तालुक्यातील पशुधनाचा आढावा | डॉ. सुनिल अण्णा गोरडे | 18 |
| 42. | "आदिवासी समूहाच्या पर्यावरण जतन करण्याच्या परंपरा" | गुमाडे समाधान बापू | 19 |
| 43. | भारतीय अर्थव्यवस्था: विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीसाठी आकर्षण केंद्र . | दिलीप आप्पा जगताप | 19 |
| 44. | शिवकालीन जलव्यवस्थापन<br>(Water Management in Chhatrapati Shivaji's Period) | प्रा. डॉ. सुनिता विजय रणाते | 20 |
| 45. | महिला सक्षमीकरण – राज्य शासनाची भूमिका | प्रा. कविता किसन भोये | 20 |
| 46. | भारतीय शेतीचा इतिहास | प्रा. डॉ. एम. आर. खोत | 20 |

| | | | |
|---|---|---|---|
| 47. | नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन व शाश्वत विकास काळाची गरज | डॉ. काळनर सुनिता | 212 |
| 48. | नाशिक जिल्ह्याच्या आर्थिक विकासात नैसर्गिक साधनसंपत्तीची भुमिका | नामदेव कारभारी डफळ<br>प्रा. डॉ. सुहास आव्हाड | 217 |
| 49. | नासिक जिल्ह्यातील जलसिंचनाचा झालेला विकास" एक भौगोलिक अध्ययन. (महाराष्ट्र) | भगवान श्याम भाऊ निकम | 223 |
| 50. | नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी लोकसंख्या बदलाचा चिकित्सक अभ्यास (सन १९७१ -२०११) | डॉ. अनिल डी. पवार | 228 |
| 51. | भारतातील बँकिंग आणिवित्तीयक्षेत्र: सिंहावलोकन | भुषण तात्यासाहेब शिरोळे | 231 |
| 52. | कृषी विपणन आणि त्यातील समस्या | श्वेताली देविदास सोनवणे | 237 |
| 53. | भारतातील बँकिंग क्षेत्रातील बदलांचे अवलोकन | गणेश बळवंत वाघ | 240 |
| 54. | कच्च्या तेलाच्या किंमती आणिभारतीय अर्थव्यवसस्था | प्रा. डॉ. एस. एन. बोढरे<br>प्रा. के. एस. चौधरी | 243 |
| 55. | "महाराष्ट्रातील सर्व शिक्षा अभियान योजनेचे मूल्यमापन" | ज्ञानदेव सुभाषकूवर | 247 |
| 56. | ग्रामीण विकासातील नाबार्डच्या भूमिका | पूजा बाळू उशीर | 250 |
| 57. | कृषी विपणन प्रक्रियेत होणाऱ्या बदलांचे आर्थिक विश्लेषण | समर्थ शरद गोऱ्हे | 253 |
| 58. | ग्रामीण भागामध्ये आर्थिक समावेशन साध्य करण्यात व्यवसाय प्रतिनिधींच्या भूमिकेचाचिकित्सक अभ्यास | योगेश लक्ष्मण भारस्कर<br>डॉ. आशालता सोनवणे | 256 |
| 59. | भारतीय आरोग्य विमा (Health insurance ) | *तुषार बापू पवार* | 260 |
| 60. | उद्योजकता : बेरोजगारी दूर करण्यासाठी काळाची गरज | प्रा.उदय खंडू टेके<br>डॉ.सोमनाथ भागा सानप | 264 |
| 61. | भारतीय आर्थिक सुधारणा | जीवन अशोक गुंजाळ | 268 |
| 62. | ई–बॅकींग मधील आधुनिक प्रवाह | प्रा. डॉ. सावंत रजनी नामदेवराव | 271 |
| 63. | महिला सबलीकरणात शासनाच्या उपाययोजना | डॉ. नानासाहेब बी. दाभाडे | 274 |
| 64. | केंद्र – राज्य आर्थिक संबंध : सिंहावलोकन | Wadge Kunal Dipak. | 278 |
| 65. | शेती तंत्रज्ञान व उत्पादकता | श्री. संदिप नारायण अहिरे | 283 |
| 66. | कृषी व्यापार व व्यावसायिक दृष्टीकोन : एक काळाची गरज | डॉ. डी. व्ही. हारगिले | 287 |
| 67. | भारतातील ग्रामीण विकासाची दशा आणि दिशा | प्रा. अमोल पर्वत गरुड | 291 |
| 68. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आर्थीक-सामाजिक सुधारणा | श्रुती उमेश दोडे | 297 |
| 69. | बजेट२०२२ :देशाच्या उज्वल भवितव्याचा योग्य मापदंड-सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन! | जाधव रूपाली निवृत्ती<br>डॉ. अमोल गायकवाड | 302 |
| 70. | भारतीय शेतीच्या शाश्वत विकासासाठी आधुनिकीकरण | डॉ. एस. पी. देवरे | 305 |
| 71. | वित्त आयोग व केंद्र - राज्य राजकीय - वित्तीय सहसंबंध | प्रा. एन. ए.पाटील | 308 |
| 72. | ऑनलाईन-ऑफलाईन संमिश्र शिक्षण पद्धतीचे सहअस्तित्व : काळाची गरज | प्रा. बी. एस. निकम | 313 |
| 73. | भारतातील बँकिंग आणि वित्तीयक्षेत्र: सिंहावलोकन | दिनेश नाना कुंभार | 317 |

# कच्या तेलाच्या किंमती आणिभारतीय अर्थव्यवसस्था

प्रा. डॉ. एस. एन. बोढरे
अर्थाशाश्त्र विभाग

प्रा. के. एस. चौधरी
भूगोल विभाग

म.स.गा. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मालेगांव (कॅम्प) नाशिक.

**घोषवारा:**

*कच्च्या तेलाच्या जागतिक किमतींमध्ये होणारी वाढ नेहमीच भारतीय अर्थव्यवस्थेसाठी आर्थिक संकटाच्या रूपात आली आहे. त्याचे अर्थव्यवस्थेवर बहुआयामी दुष्परिणाम होतात. केअर रेटींग्जनुसार भारत 157.5 कोटी बॅरल कच्चे तेल खरेदी करतो. अशा कच्च्या तेलाच्या किंमतीत 1 डॉलर प्रति बॅरलने वाढ झाली तरी आयातीमध्ये 10,000 कोटी रुपयांची वाढ होते.म्हणजेच डॉलरच्या तुलनेने रुपया कमकुवत होतो आणि आयातीची किंमत वाढते. अशा वेळेस अर्थव्यवस्थेची चालू खात्यातील तूटही वाढते. शेवटी, वित्तीय तुटीच्या अंदाजावरही याचा परिणाम होतो. या सगळ्याचा नकारात्मक परिणाम भारतीय शेअर बाजारावरही होतो. तसेच याचा परिणाम तेल कंपन्यांच्या नफ्यावरही होतो. या सगळ्याचा सामना करण्यासाठी सरकारसमोर पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीच्या देशांतर्गत किमती वाढवणे हा एकमेव उपाय आहे. पण या समस्येवर हा एकतर्फी उपाय आहे. त्यामुळे थेट महागाई वाढते. जर आपण केंद्रीय उत्पादन शुल्काच्या दरांबद्दल बोललो, तर गेल्या काही वर्षांत केंद्रीय उत्पादन शुल्कात मोठी वाढ झाली आहे. पाच-सहा वर्षांपूर्वी पेट्रोलवरचे उत्पादन शुल्क जिथे प्रतिलिटर 9.48 रुपये होते, ते गेल्या वर्षीपर्यंत ते 35 रुपयांच्या आसपास पोहोचले आहे. पेट्रोलच्या तुलनेत डिझेलच्या दरात अधिक वाढ झाली आहे. त्यामुळे कच्च्या तेलांच्या किमतीत होणारी वाढ ही भारतासाठी नक्कीच चिंताजनक आहे.*

**प्रास्ताविक:**

जागतिक अर्थव्यवस्थेवर तेलाचं अधिराज्य आहे हे आपल्या सगळयांनाच ठाऊक आहे. तेलाचं अर्थकारण आणि पेट्रो-डॉलर या संकल्पना त्यामुळेच अस्तित्वात आल्या. प्रामुख्याने कच्चया तेलाचा साठा हा जमिनीखाली असतो तिथून ड्रिलिंग पद्धतीने तो बाहेर काढून, प्रक्रिया उद्योगांना विकेपर्यंत त्याची बॅरल किंवा पाईपमध्ये साठवन करावी लागते. बाहेर काढलेलं हे कच्चं तेल मग शुद्धीकरण आणि इतर प्रक्रिया करून इंधन या स्वरुपात वापरलं जात. या इंधनामध्ये विमानांसाठी लागणारं इंधन, पेट्रोल, डिझेल, केरोसिन इ. अनेक प्रकारचं इंधन असतं. साधारणतः क्रूड तेलाचे दोन प्रकार दिसून येतात त्यामध्ये अमेरिकेत बनतं ते *लाईट क्रूड* तेल व जगभरात बहुतेक करून बनतं ते *ब्रेंट क्रूड* तेल होय. भारतात मात्र ब्रेंट क्रूड तेलच वापरल जात.जगभरात दररोज अंदाजे 100 दशलक्ष बॅरेल क्रूड तेलाचा वापर होतो. अमेरिका सध्या जागातील सर्वांत मोठा तेल उत्पादक देश आहे. पण अमेरिकी खनिज तेल तुलनेने महाग आहे."भारत हा जगामध्ये तेलाचा उत्पादक नाही तर मागणी आणि खप असलेला देश म्हणून ओळखला जातो". भारत कच्चे तेल आयात करणारा जगातला तिसरा मोठा देश असून, तेलाच्या गरजेच्या 80 टक्के म्हणजे दरवर्षी सुमारे १.५ अब्ज बॅरल कच्चया तेलाची आयात केली जाते. त्यामध्ये सौदी अरेबिया आणि इराक हे प्रमुख देश आहेत ज्यांच्याकडून भारत(ओपेक गटातून) तेल खरेदी करतो.

कच्चे तेल (crude oil) महाग झाल्यामुळे देशात पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतीत आणखी वाढ होईल. कारण आयात कच्चया तेलावर प्रक्रिया केल्यानं तेलाच्या किंमती जास्त असतात, त्यामध्ये शुद्धीकरणासाठी लागणारा खर्च, वाहतूक, वितरण आणि करासाठी अतिरिक्त शुल्क किरकोळ किंमतीमध्ये जोडला जातो.या वाढत्या किंमतींमुळे मालवाहतूक महाग झाली असून शेतीचा खर्चही वाढला आहे. अशा वेळेस महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँकेला रेपो दर वाढवावा लागतो. यामुळे बाजारातील रोख रक्कम कमी होते.

भारतात विविध उत्तापादनांपासून ते घरांमध्ये वापरल्या जाणाऱ्या वस्तू पुरवण्यापर्यंत सर्व गोष्टींसाठी इंधनाचा वापर केला जातो. थोडक्यात,कच्च्या तेलाची गरज लोकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित आहे.

**उदिष्टे:**

जागतिक बाजारातील कच्च्या तेलाच्या किमंतीत होणारे बदल जाणून घेणे व त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम.

**संशोधन पद्धती:**

सदर शोधनिबंद हा पूर्णत:दुय्यम साधन सामग्रीवर आधारित असून यासाठी वर्तमान पत्रातील कच्च्या तेलाच्या किंमती व भारतीय अर्थव्यवस्था संदर्भातील विवध लेख, मासिकांमध्ये प्रकाशित झालेले लेख, संकेतस्थळावरीलमाहिती, इ.संदर्भ साहित्य म्हणून वापर केलेला आहे.

**कच्च्या तेलाच्या किमतीतील बदल आणि भारतीय अर्थव्यवस्था**

जागतिक स्तरावर कच्च्या तेलाचे दर ठरविण्याचा अधिकार प्रामुख्याने OPEC (Organizations of Petroleum Exporting Countries) या संघटनेला आहे. मात्र कच्च्या तेलाची मागणी व पुरवठा हा एक प्रमुक घटक किंमतीतील बदलामागे आहे. तसेच युद्धजन्य परिस्थिती, महामारी, आर्थिक अस्थिरता, इ. बाह्य घटकांचा देखील कच्च्या तेलाच्या किंमतीच्या बदलावर परिणाम होतो. 2000 या वर्षामध्ये ब्रेंट क्रूड तेलाचे भाव 26.72 डॉलर इतके होते. 2003 पासून जागतिक अर्थव्यवस्थेत मोठी तेजी पहावयास मिळाली आणि ती 2007 पर्यंत टिकून होती. हा बुडबुडा फुटल्यावर 2008 मध्ये ते परत 44.6 डॉलरवर घसरले. 2012 आणि 2013 मध्ये पुन्हा वाढ झाली. त्याच प्रमुख कारण म्हणजे कच्च्या तेलाच्या पुरवठ्याचा एक नवीन स्रोत पुढे आला. अमेरिकेमध्ये शेल गॅस व शेल ऑईलच्या नवीन तंत्रज्ञानावर आधारित विहिरी खोदल्या जाऊ लागल्या. त्यात प्रचंड प्रमाणात गुंतवणुकीचा ओघ आला आणि उत्पादन एवढं वाढलं, की अमेरिका इंधनाच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. एवढंच नव्हे, तर तिथून निर्यातीलाही सुरवात झाली. त्याचा परिणाम म्हणून 2014 मध्ये भाव 53.45 डॉलर प्रती बॅरल वर, तर 2015 मध्ये 37.13 डॉलर प्रती बॅरलच्याही खाली पोचले. याचा परिणाम अनेक शेल ऑइलच्या विहिरींवर होऊन त्यानंतर काळात उत्पादन परवडेनासं झाल्यामुळं ते घटलं. भाव हळूहळू 53 डॉलर प्रती बॅरलच्या पुढं गेले. याच दरम्यान इराणवरचे निर्बंध हटवले गेल्यानं त्यांचा पुरवठाही वाढला. आता इराणवर पुन्हा निर्बंध घालण्यामुळं या भावांमध्ये वाढ होत आहे. जागतिक अर्थव्यवस्था मंदीतून बाहेर येत असल्यानं मागणीही वाढून हे भाव 2019 पर्यंत 61.14 च्या कक्षेत आले.

रशिया आणि सौदी अरेबिया हे देशही उत्पादनात घट करून कच्च्या तेलाचं भाव वाढावे, यासाठी प्रयत्नशील होते. सौदी अरामको या बलाढ्य तेल कंपनीच्या नवीन शेअरविक्रीचा प्रस्ताव बाजारात आणण्याचा त्यांचा मानस असल्यानंसुद्धा हे भाव वर ठेवण्यात त्यांना रस होता. इराणचा उत्पादनात घट करण्यास विरोध असल्यानं हे भाव साठ डॉलरच्या आसपास स्थिर राहत होते. आता इराणवरच्या निर्बंधांमुळं पुन्हा भाववाढीला खतपाणी मिळत राहिलं. कोविड 19 मुळे जागतिक स्तरावर उद्योगधंदे लॉकडाऊन झाल्यामुळे बंद झाले तिथे इंधनाची मागणी खूपच कमी झाली होती. तसेच अनेक ठिकाणी तेल प्रक्रिया उद्योगही बंद करण्यात आले होते.विमानं आणि गाड्याही रस्त्यांवर नाहीत. त्यामुळे पेट्रोल, डिझेललाही जवळ जवळ शून्य मागणी होती. तरी कच्च्या तेलाचं उत्पादन मात्र सुरू असल्याने कच्च तेल साठवण्यासाठी तेल उत्पादक कंपन्यांना बॅरल आणि पाईपही कमी पडत होते. अतिरिक्त तेलाचा साठा करणं शक्य नाही. अशा दुष्टचक्रात कोविड कालखंडात जगभरातील तेल उद्योग सापडला होता. मंगळवार, 20 एप्रिल 2020 रोजी न्यूयॉर्कमध्ये कच्च्या तेलाच्या किंमतीत आतापर्यंतची सर्वात मोठी घसरण पाहायला मिळाली. म्हणजेच शून्यापेक्षाही कमी, 55.90 डॉलर प्रति बॅरेलहून वरून -37.56 डॉलर्स इतकी झाली. प्रति बॅरल जवळपास 300 टक्कें‌नी घसरली.

जगभरात, कोविड 19 ची परिस्थिती अजून पूर्वपदावर आलेलीनाही त्यातच रशियाने युक्रेनवर केलेल्या हल्ल्यामुळे आर्थिक स्थिती पुन्हा बिस्कळीत झाली आहे. त्याचा थेट परिणाम कच्चे तेल आणि नैसर्गिक वायूच्या पुरवठ्यावर आणि त्यांच्या किंमतीवर होतो आहे. अमेरिकेच्या वायदे बाजारात गहू आणि सोयाबीनच्या दरात दिवसभरात कमालीची वाढ झाली आहे. या वाढीमुळे सोयाबीनचे भाव 2012 नंतरच्या सर्वोच्च पातळीवर पोहोचले. त्याचबरोबर गव्हाचे भाव 9 वर्षांच्या सर्वोच्च पातळीवर आहेत. मक्का 8 महिन्यांच्या उच्चांकावर आहे. आजच्या व्यवहारात मे महिन्यसाठीच्या कंत्राटात गव्हाच्या भावात 5.7 टक्के, मकयामध्ये 4.7 टक्के आणि सोयाबीनच्या भावामध्ये 2 टक्के वाढ झाली आहे.

**देशांतर्गत पेट्रोलियम पदार्थांची मागणी:**

भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये आर्थिक वाढ होत असल्यानं ग्राहकांच्या हातात अधिकाधिक क्रयशक्ती येते त्यामुळे दुचाकी आणि चारचाकी वाहनांचं खरेदी करण्याच प्रमाण झपाट्यानं वाढत आहे. शहरीकरणाच्या रेट्यामुळं आणि सार्वजनिक वाहतूकव्यवस्थेच्या अपुरेपणामुळं पेट्रोलियम पदार्थांचा वापर वाढत आहे. पेट्रोलचा वापर 2013-14 च्या तुलनेत 2017-18 पर्यंत 53 टक्के वाढला. डिझेलचा वापर पेट्रोलच्या तुलनेत साडेतीन पट आहे. हा वापरही 18 टक्के वाढला. रेल्वेनं वाहतूक करणं सोयीस्कर आणि किफायतशीर नसल्यानं अधिक प्रमाणात वाढणाऱ्या ट्रकवापराचाही यात भाग आहे. विमानप्रवासाचं प्रमाणही वाढतंच आहे. विमानाच्या इंधनाच्या खपातही याच कालावधीमध्ये 38 टक्क्यांची वाढ झाली आहे.

**पेट्रोलियम पदार्थांवरची कररचना:**

कच्च्या तेलाच्या प्रत्यक्ष मूल्यापेक्षा करभार जास्त आहे, ही वस्तुस्थिती आहे. यामध्ये पेट्रोल आणि डिझेलमधल्या करांच्या दरात आजही मोठा फरक आहे. डिझेलची विक्री पेट्रोलच्या साडेतीनपट असल्यानं डिझेलवरचा कर एक रुपयानं वाढवला, तर पेट्रोलवरचा कर साडेतीन रुपयांनी कमी करणं शक्य होईल आणि यातून वित्तीय तुटीवरही विपरीत परिणाम होणार नाही. मात्र, यापेक्षा ठळक महत्त्वाची गोष्ट अशी आहे, की केंद्र सरकारपेक्षा राज्य सरकारांच्या अर्थसंकल्पात पेट्रोलियम पदार्थांवरच्या करांचा फार मोठा वाटा आहे. राज्य सरकारांचा व्हॅट वीस टक्क्यांहून कमी अपवादानंच आहे आणि काही राज्यांमध्ये तो तब्बल चाळीस टक्क्यांपर्यंतही आहे. बरीचशी राज्यं डिझेलवर कमी व्हॅट लावतात. याच कारणासाठी पेट्रोलियम पदार्थ जीएसटीमध्ये आणण्यास राज्यांचा विरोध आहे. जीएसटीचा सर्वोच्च दर 28 टक्के लावला, तरी त्यात राज्यांचा वाटा फक्त 14 टक्के राहील आणि हे उत्पन्न राज्यांना परवडणार नाही.

आंतरराष्ट्रीय बाजारातले कच्च्या तेलाचे दर चढे असताना सरकारनं कर कमी करून ग्राहकांसाठीचे दर कमी ठेवण्याचा पायंडा 2013 च्या आर्थिक संकटानंतर तेव्हाचे अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी बदलला होता. हे होण्यापूर्वी सरकारनं तेलासाठी कर्जरोखे काढून त्याचा बोजा सार्वजनिक क्षेत्रातल्या तेल विपणन कंपन्यावर टाकला होता. नंतरच्या काळातल्या करसंकलनाचा बराचसा भाग या कर्जरोख्यांची परतफेड करण्यासाठी वापरावा लागला होता. या पार्श्वभूमीवर करसंकलनामध्ये कपात करून ग्राहकांसाठीचे दर कमी करण्याचा मोह टाळणं आवश्यक आहे. असं न केल्यास चालू खात्यावरच्या तुटीबरोबरच वित्तीय तूटही वाढू लागेल आणि परकी भांडवलाचा प्रवाह पूर्णपणे उलट्या दिशेला जाईल.

**जीवनावश्यक वस्तूवरील भाववाढ:**

कच्चे तेल महाग झाल्यामुळे देशात - कांदा, टोमॅटो, अंडी, तेल आणि शुद्ध खाण्याचे तेल यासारख्या जीवनावश्यक खाद्यपदार्थांच्या किंमतीतवाढ झाल्याशिवाय राहत नाही. जर कच्च्या तेलाच्या किंमती सातत्याने वाढत राहिल्या तर महागाई निर्माण होते. याचा मागणी आणि पुरवठा या दोन्ही गोष्टींवर नेहमीच परिणाम होत असतो.

**विनिमय दर:**

भारताचे इराणबरोबर सलोख्याचे संबंध होते तेव्हा कच्च्या तेलासाठी असलेली किंमत किफायतशीर ठरत होती. मात्र, इराणवरच्या निर्बंधांमुळं या मार्गावरसुद्धा एक प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे. या वाढत्या कच्च्या तेलाच्या

किमतीमुळं 4.5 अब्ज डॉलरचा अतिरिक्त ताण वाढला. वार्षिक हिशेबाच्या दृष्टीनं हा दबाव वर्षाला 54 अब्ज डॉलर एवढा आहे. अर्थातच तेलाची आयात सुमारे पाच अब्ज डॉलरनी वाढलेली दिसते. या सर्व बाबींचा एकत्रित परिणाम डॉलरच्या तुलनेत रुपया घसरण्यामध्ये झाला आहे.

**डॉलर, सोनं आणि कच्चं तेल:**

कच्च्या तेलाच्या आणि डॉलरच्या किंमती वर जात असताना सोन्याचे भाव स्थिर कसे, असाही प्रश्न अनेकांच्या मनात येतो. कच्चं तेल या वस्तूचा पुरवठा बदलू शकतो आणि उपभोग्य असल्यामुळं मागणीतही अर्थव्यवस्थेच्या वाढीप्रमाणं वध-घट होते. जागतिक उत्पन्न वाढतं असेल, तर पेट्रोलियम पदार्थांचा खप वाढतो. सोन्याची परिस्थिती मात्र अतुलनीय आणि वेगळी आहे. कागदी चलन रुढ होण्यापूर्वी हजारो वर्षं सोन्याला चलन म्हणून स्वीकार झाला आहे. सोन्याचा जगातला साठा 168 हजार टनांवर मर्यादित आहे आणि नवीन पुरवठा वाढण्याची शक्यता नाही.

थोडक्यात, भारतीय अर्थव्यवस्थेवर कच्चा तेलाच्या किंमतीचा प्रभाव प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष स्वरुपात झालेला दिसून येतो.

**सारांश:**

जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या किंमतीतील बदलामागे मागणी व पुरवठा हा एक प्रमुखघटक आहे. तसेच युद्धजन्य परिस्थिती, महामारी, आर्थिक अस्थिरता (तेजी-मंदी), इ. बाह्य घटकांचा देखील कच्च्या तेलाच्या किंमतीच्या बदलावर परिणाम होतो.सध्याक्रूडच्या किमतीत वाढ होण्याचे एक कारण म्हणजे जागतिक अर्थव्यवस्था महामारीच्या परिणामांमधून बाहेर पडत आहे आणि आर्थिक हालचालींनी वेग घेतला आहे. त्यामुळे जागतिक पातळीवर कच्च्या तेलाच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. कच्च्या तेलाची मागणी वाढण्याचे आणखी एक कारण म्हणजे कोळसा आणि नैसर्गिक वायूच्या किंमतीत झालेली वाढ. तसेचरशियाने युक्रेनवर केलेल्या हल्ल्यामुळे जागतिक स्तरावर भीतीचे वातावरण निर्माण झाले असून आर्थिक स्थिती पुन्हा विस्कळीत झाली आहे. त्याचा थेट परिणाम कच्चे तेल आणि नैसर्गिक वायूच्या पुरवठ्यावर आणि त्यांच्या किंमतीवर होत आहे.तसेचभारतीयअर्थव्यवस्थेतयाचा परिणाम वाढीव आयात खर्चावर होऊन चालू खात्यातील तूट वाढण्यावर होतो,पेट्रोल आणि डीझेल दरवाढ होते त्याचा सरळ परिणाम महागाई वाढण्यावर होतो,शेअर बाजार घसरण्यास सुरवात होते. तसेचशिपिंग, रेल्वे, बस आणि विमान प्रवास महाग होतो.परिणामीआरबीआय रेपो दरात वाढ करते.

आंतरराष्ट्रीय बाजारात तेल स्वस्त होते, तेव्हा आयात मात्रस्थिर राहते त्यामुळे रुपयाला त्याचा फायदा होतो. डॉलरच्या तुलनेत रुपया मजबूत होतो त्याचा भारतीय बाजारावरही थोडाफार परिणाम होऊन तेलाच्या किंमती कमी होतात.आणि महागाईही नियंत्रणात येते.

**संदर्भ:**


1. अर्थसंवाद खंड-३६, अंक-3, ऑक्टोबर-डिसेंबर-2012Pankaj Bhattacharjee,"A Study Of The Impact Of Crude Oil Prices On Indian Economy",Ph.D Thesis,Navi Mumbai, June-2013
2. https://pib.gov.in
3. https://www.loksatta.com
4. https://mr.wikipedia.org

https://maharashtratimes.com

https://www.dainikprabhat.com

https://www.esakal.com